IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# दाभा (जमनी) गावातील मजुरांच्या पाल्यांच्या शैक्षणिक समस्या

**[1]Bhushan Bhimrao Tembhurne, [2]Priya Dilip Karhade**

[1]Athawale College of Social Work,Warthi Road, Bhandara, MS India.
[2]Department of Zoology, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur, MS India.

***सारांश :***

*प्रस्तुत शोधनिबंधात दाभा (जमनी) या गावातील मजुरी करणाऱ्या मजूर वर्गाच्या पाल्यांच्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. शिक्षण ही काळाची गरज आहे.परंतु महाराष्ट्रातील आणि विशेषतः ग्रामीण भागातील शैक्षणिक स्थिती अत्यंत गंभीर होत चाललेली आहे. मुख्यत्वे जर आपण ग्रामीण भागाचा विचार केला, तर काही काही भागात शिक्षणाबद्दल खूप विपरीत परिस्थिती निर्माण झालेली पाहायला मिळते.*

*देशाची प्रगती ही शिक्षणावर अवलंबून आहे. वास्तविक पाहता डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला वाघिणीचे दूध म्हटले आहे.पण आज ग्रामीण भागात हेच दूध प्यायला तुटपुंज्या परिस्थितीत दाभा (जमनी) या गावातील मजुरी करून जगणाऱ्या कुटुंबातील विद्यार्थ्यांना मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. सदर संशोधनाकरिता भंडारा जिल्ह्यातील दाभा (जमनी) या गावातील मजुरांच्या पाल्यांना शिक्षणामध्ये भेडसावणाऱ्या विविध समस्यांचे विस्तृतपणे प्रकटन केले गेले आहे.*

***मूळ शब्द*** *- मजूर, पाल्य, शैक्षणिक, ग्रामीण, दाभा*

**प्रस्तावना :**

आज कोणत्याही क्षेत्रात जर प्रगती साधायची असेल तर शिक्षण हे एक प्रभावी साधन मानले जाते. सध्याची परिस्थिती पाहिली तर शहरी भागात शिक्षणात खूप प्रगती झालेली दिसते. परंतु काही ग्रामीण भागात परिस्थितीने गांजलेले, मजुरी करून कुटुंबाचे पोट भरणारे मजूर पाल्यांना शिक्षण देण्यास असमर्थ दिसतात. हीच परिस्थिती दाभा (जमनी) या गावातील मजुरांच्या पाल्यांत पहायला मिळते. गावात मजुरी करून जगणाऱ्यांचे प्रमाण 80% आहे. सदर गावातील मजुरांच्या पाल्याची शैक्षणिक स्थिती ही फार खुंटलेली दिसते. 20% विद्यार्थी हे दहावी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करू शकत नाही. आपल्या पाल्याने शिक्षण घ्यावे असा आग्रहही गावातील मजूर वर्ग धरीत नसल्याने अज्ञानाची बिकट परिस्थिती निर्माण झालेली दिसते. शैक्षणिक जागृतीचा अभाव असल्याने कित्येक मजूर वर्ग हे आपल्या पाल्यांना उच्च शिक्षणापासून वंचित ठेवतात आणि याचा मुख्यत्वे परिणाम हा गावातील प्रगतीवर होत आहे.

गावातील गरीब, होतकरू मजूर वर्ग आजही मागासलेले जीवन जगत आहे. अडाणी मजूर पालकांना शिक्षणाचे महत्व माहीत नसल्यामुळे, आपल्या पाल्यांना चांगले शिक्षण देणे हे त्यांना आवश्यक वाटत नाही. याच कारणामुळे गावात असलेल्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचे प्रमाण कमी होत असल्याचे दिसत आहे. शिक्षणात खर्च आहे असाही

गैरसमज मजूर वर्गात असल्याने, कित्येक मजूर पालकांचे आपल्या पाल्यांना उच्च शिक्षण देण्याचे स्वप्न हे स्वप्नच राहिले आहे. उदरनिर्वाहाच्या शोधात आमचे पूर्ण आयुष्य जाते, उच्च शिक्षणासाठी पैसा आणायचा तरी कुठून अशी भयान गाथा येथील मजूर वर्ग मांडतात.अन्न,वस्त्र व निवारा या प्राथमिक गरजा पूर्ण करण्यातच त्यांचे अख्खे आयुष्य निघून जात आहे. शिक्षणाकडे ते अजिबात लक्ष पुरवू शकत नाही. याच पार्श्वभूमीवर मजुरी करून जगणाऱ्या पालकांच्या पाल्यांचे शैक्षणिक समस्या अभ्यासण्यासाठी मजुरी करणाऱ्या 40 कुटुंबांची निवड केली गेली आणि त्यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक समस्या जाणून घेण्यात आल्या.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1) दाभा (जमनी) या गावातील मजुरी करून जगणाऱ्या पालकांच्या पाल्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांचा आढावा घेणे.
2) दाभा (जमनी) येथील मजुरांच्या पाल्यांच्या शिक्षणात येणाऱ्या मूळ समस्यांची दिशा तपासणे.

**संशोधनाची गृहीतके :**

1) दाभा (जमनी) या गावातील मजुरी करणाऱ्या पाल्यांची बिकट शैक्षणिक प्रगती.
2) दाभा (जमनी) या गावातील मजुरांच्या पाल्यांचे शाळा सोडण्याचे तसेच निरक्षरतेचे प्रमाण.

**संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :**

**१) व्याप्ती :**

वरील संशोधन हे दाभा (जमनी) गावातील मजुरी करून जगणाऱ्या मजूर वर्गातील पाल्यांच्या शैक्षणिक समस्येबाबत आहे. या संशोधनासाठी ४० कुटुंबांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**२) मर्यादा :**

सदर संशोधन हे केवळ दाभा (जमनी) या गावातील मजुरांच्या पाल्यांच्या शैक्षणिक समस्येपुरताच मर्यादित आहे.

**संशोधन पद्धती :**

**१) संशोधन आराखडा :**

सदर संशोधनासाठी वर्णनात्मक तसेच विश्लेषणात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग केलेला आहे.

**२) तथ्य संकलन :**

प्रस्तुत संशोधनामध्ये प्राथमिक स्त्रोतात मुक्तपणे चर्चा करून, मुलाखत तसेच दुय्यम स्त्रोतामध्ये पुस्तके, अधिकृत संकेतस्थळ, संदर्भग्रंथ इत्यादी चा वापर केलेला आहे.

**३) तथ्याचे विश्लेषण आणि निर्वाचण :**

आशय विश्लेषण पद्धतीचा वापर करून तथ्याचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. या संशोधनातून दाभा (जमनी) गावातील मजुरांच्या पाल्यांच्या शैक्षणिक समस्यांचे निराकरण करण्याचे प्रयत्न केले गेले पाहिजेत असा दृष्टीकोन पुढे ठेवण्यात आलेला आहे.

**दाभा या गावातील मजुरांच्या समस्या :**

**१) गरिबी :**

ग्रामीण भागात मजुरी करून जगणाऱ्या पालकांना पाल्यांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी असंख्य अडचणींचा सामना करावा लागतो. त्यातील मुख्य अडचण म्हणजे पालकांची ढासळलेली आर्थिक बाजू म्हणजे गरिबी. गरिबीमुळे दाभा (ज.) गावातील मजुरी करणारे पालक पाठ्यपुस्तक, दप्तर, शाळेचा गणवेश तसेच इतर खर्च यामुळे मुख्यत्वे पाल्यांचा शैक्षणिक खर्च नाकारतात असे पाहायला मिळाले.

**२) शैक्षणिक जाणीवेचा अभाव :**

दाभा (ज.) गावातील मजुर वर्ग निरक्षर असल्याने आपल्या पाल्यांच्या शिक्षणा विषयी जागरूक नाही. मजुरवर्ग शाळेत घेण्यात येणाऱ्या पालकसभेला सुद्धा उपस्थित राहण्याची आवश्यकता समजत नाही. शाळेतील पालक सभेतील पालकांची उपस्थिती नगण्य असते. शैक्षणिक जाणिवेच्या अभावातून मजूर पालक आपल्या पाल्यांना लहानपणा पासूनच मजुरीच्या कामात गुंतवतात. गावातील काही मजूर पालक व्यसनी असल्याने ते लहानपणापासूनच पाल्यांमागे पैसे कमावण्यासाठी तकादा लावून बसतात. त्यांच्या या मानसिकते मुळे इच्छा असूनही कित्येक मुलांना शिक्षण घेता येत नाही अथवा अर्ध्यावर शिक्षण सोडावे लागते.

**३) घरच्या समस्या :**

दाभा (ज.) गावातील कित्येक मजुरवर्ग पैश्याच्या प्रलोभणापायी शहरात काम करायला जातात. गावात त्यांच्या आवश्यकतेनुसार रोजगार नसल्याने ते स्थलांतर करतात. आपल्या पाल्यांची जबाबदारी ते घरातील म्हाताऱ्या व्यक्तीकडे सोपवतात. आई-वडिलांचे लक्ष नसल्याने त्यांची मुले शाळेकडे दुर्लक्ष करतात. मजूर आई – वडिलांच्या दुर्लक्षपणामुळे कित्येक मुलांनी मध्येच शाळा सोडून दिल्याचे संशोधनातून निदर्शनास आले.

**४) मुलींच्या शैक्षणिक समस्या :**

मजुरांच्या मुलींच्या संदर्भात तर काही वेगळेच चित्र गावात पाहायला मिळाले. सदर गावात कमी वयातच मजुर वर्गाच्या मुलींचे लग्न केले जाते. पालकांना मुलींच्या शिक्षणाचा बोजा वाटायला लागते तेव्हा कित्येक मुलींचे विवाह इयत्ता १० वी दरम्यानच केले जाते. याच कारणांनी मुलींचे शिक्षण थांबते. काही मुलीतर मजुरी करणाऱ्या आई-वडिलांना आर्थिक मदत व्हावी म्हणून शाळा बुडवून मजुरीला लागतात आणि कालांतराने शिक्षण सोडतात.

**५) शिक्षण सोडवण्यासाठी पालकांची धडपड :**

गावातील कित्येक मजुर वर्ग आपला पाल्यांना नापास झाला तर त्याचे खच्चीकरण करून आपल्या पाल्याला शिक्षण सोडण्यास प्रवृत्त करतात असे संशोधना दरम्यान दिसून आले. काही मजुरी करणारे पालक आपल्या मुलांना लहानपणा पासून कामात गुंतवून ठेवतात. त्यामुळे पाल्य हा आपल्या शिक्षणाकडे लक्ष देऊ शकत नाही. परिणामतः पाल्यांची शैक्षणिक गोडी कमी करून त्यांना शिक्षण सोडण्यास भाग पाडले जाते. कामामुळे मजुर वर्गातील पाल्यांना शिक्षणाची विशेषतः आवड नसल्याचे संशोधना अंती दिसून येते.

**निष्कर्ष** :

शिक्षण घेण्यासाठी दाभा (ज.) गावातील मजूरवर्गांच्या पाल्यांना भीषण शोषणाला समोर जावे लागत आहे. काही पालकांना आपले पाल्य शिकावे अशी इच्छा असूनही आपल्या गरिबीपोटी ते पाल्यांचे उच्च शिक्षण पूर्ण करू शकत नाही. सदर गावातील मजुरी करणाऱ्या पालकांची सवयी त्यांच्या पाल्यांमध्ये पाहायला मिळत आहे. मजूर व त्यांचे परिस्तिथीमुळे शिक्षणा विषयक नकारात्मक विचार हे त्यांच्या स्वतःच्या व गावाच्या प्रगतीसाठी एक प्रकारे भिषण संकट बनत चालले आहे. याच संकटा मध्ये मजुरांच्या मुलांचे भविष्य अंधारात निपचित पडून आहे. यावरून मजुरांच्या पाल्यांची शैक्षणिक स्थिती आपणांस पाहायला मिळते. त्यांच्या या समस्यावर पाठपुरावा करणे ही काळाची गरज आहे.

**संदर्भ सूची :**

१) बोरकर व्ही. (२०१९). "ग्रामीण भागातील शैक्षणिक अवस्था" मराठीसृष्टी.
२) चोपडे टी. (१९६७). "ग्रामीण शिक्षणाची मूलतत्त्वे, पुणे.
३) "गरिबी, शिक्षण आणि क्षमता", महाराष्ट्र टाईम्स. १० जून २०१८.
४) केळकर स. आ. (१९५६). "ग्रामीण बाल शिक्षण व त्यांचे प्रश्न", मुंबई.